महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८e /२०२४ दि. २६/०४/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

संदर्भ :– १) जा.क्र. वि.शा./राजकीय/लोसानि/१८८४/२०२४, दि. १७/०४/२०२४.
२) फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये मनाई आदेश.

ज्याअर्थी, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने विविध राजकीय पक्षांचे नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया दि. २६/०४/२०२४ ते दि. ०६/०५/२०२४ रोजीपावेतो मा. प्रांत अधिकारी कार्यालय भिवंडी, येथे पार पडणार आहे. लोकसभा निवडणूक २०२४ चे अनुषंगाने नामनिर्देशन प्रक्रिया संदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये वर नमूद कार्यालयाचे १०० मीटर परिसरात वाहने आणण्यास संदर्भ क्र. २ अन्वये मनाई आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) भिवंडी शहरात गुजरात वाडा कडून येणाऱ्या सर्व प्रकारच्या **जड अवजड** वाहनांना **वंजारपट्टी** नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वंजारपट्टी ब्रिजवरून चाविंद्रा नाशिक हायवे मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) भिवंडी शहरातून वंजारपट्टी नाका कडून जाणाऱ्या हलक्या वाहनांना **भिवंडी एस टी स्टॅन्ड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने भिवंडी एस टी स्टॅन्ड येथून वळसा घेवून वंजारपट्टी नाका, जूना निजामपूरा, चाँदतारा मस्जिद मार्गे, स्व.आनंद दिघे चौकातून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) रांजनोली नाका व अंजूरफाटा कडून वाडा गुजरातकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **रांजनोली नाका व अंजूरफाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने अंजूरफाटा येथून मानकोली नाशिक हायवे मार्गे व रांजनोली नाका येथून नाशिक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) रांजनोली नाका व अंजूरफाटा कडून वाडा गुजरात कडे जाणाऱ्या हलक्या वाहनांना **स्व.आनंद दिघे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने स्व.आनंद दिघे चौकातून क्वार्टर गेट मस्जिद, जूना निजामपूरा, वंजारपट्टी मार्गे वाडा किंवा नाशिक कडे जातील.

**नो पार्किंग –** स्व.आनंद दिघे चौक ते भिवंडी एस टी स्टॅन्ड परिसरात रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतेही वाहन पार्क करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना दि. २६/०४/२०२४ ते दि. ०६/०५/२०२४ या कालावधीत ज्या दिवशी नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज माघारी घेणेबाबतची प्रक्रिया सुरू असेल तसेच सदर परिसरात गर्दी होण्याची शक्यता असेल त्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :— नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग, पोनि ठाणेनगर वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner

महाराष्ट्र पोलीस
दूरध्वनी क्र :२५३४२९२६

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा, ठाणे यांचे
कार्यालय ठाणे प -४००६०१
Email ID: cp.thane.sbpolitic@mahapolice.gov.in

जा.क्र./वि.शा./राजकीय/लोसानि/१८८/२०२४ ठाणे शहर दि :-१८/०४/२०२४

**अतितात्काळ निवडणूक प्राधान्य**

प्रति,

पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ १,२,३ व वाहतूक शाखा.

विषय :- लोकसभा निवडणूक - २०२४ नामनिर्देशन बंदोबस्ताबाबत.

--------00000--------

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषगांने दि. २६/०४/२०२४ पासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. ठाणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत ०३ लोकसभा मतदारसंघ असून नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज माघारी घेणेबाबतची प्रक्रिया दि.२६/०४/२०२४ ते दि.०६/०५/२०२४ या कालावधीत खालील ठिकाणी होणार आहे.

| मतदारसंघ | नामनिर्देशन स्विकारण्याचे ठिकाण | परिमंडळ कार्यक्षेत्र | पोलीस स्टेशन कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| २३- भिवंडी | उप विभागीय कार्यालय, भिवंडी | परिमंडळ - २ भिवंडी | शांतीनगर |
| २४- कल्याण | सावळाराम क्रीडाभवन, डोंबिवली (पू.) | परिमंडळ - ३ कल्याण | मानपाडा |
| २५ - ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे | परिमंडळ - १ ठाणे | ठाणेनगर |

नमुद ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी हे नामनिर्देशन अर्ज स्विकारणार आहेत. संबधित अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन योग्य तो पोलीस बंदोबस्त पुरविणे अत्यंत आवश्यक आहे. त्याअनुषगांने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन नमुद ठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमावा.

लोकसभा निवडणूक-२०२४ च्या अनुषगांने नामनिर्देशन प्रक्रिया संदर्भात **फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये मनाई आदेश** निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर पत्रासोबत जोडलेल्या मनाई आदेशाचे अवलोकन करून त्यात नमुद निर्देशानुसार आदर्श आचार संहितेच्या अनुषंगाने काटेकोर पालन करावे.

पोलीस उप आयुक्त, वाहतूक शाखा, यांनी संबधित नामनिर्देशन कार्यालयाचे परिसरात बॅरीकेटींग करून घेवून रहदारी सुरळीत राहील याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

( सचिन गोरे )
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा
पोलीस आयुक्त, ठाणे करीता

मा. पोलीस सह आयुक्त
यांचे मान्यतेने

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव
अपर पोलीस आयुक्त, पूर्व व पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

Scanned with CamScanner
CamScanner

**फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये मनाई आदेश**

---

**१) भारत निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक १६/०३/२०२४ रोजीचे प्रेस नोटनुसार.**
**२) जा.क्र.वि.शा./लोकसभा निवडणुक/मनाई आदेश/ ०६ /२०२४ दिनांक:-१८/०४/२०२४**

---

**आदेश:-**

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क्र. १ मधील अधिसूचनेनुसार भारत निवडणूक आयोगाने, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम जाहीर केलेला असून दिनांक १६/०३/२०२४ रोजीपासून आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे. लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये २३-भिवंडी, २४-कल्याण व २५-ठाणे असे ०३ लोकसभा मतदार संघ येतात. सदर मतदारसंघात दिनांक २०/०५/२०२४ रोजी मतदान व दिनांक ०४/०६/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

लोकसभा निवडणूकीचे अनुषंगाने नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया दिनांक २६/०४/२०२४ रोजी सुरू होणार असून नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक ०३/०५/२०२४ रोजी पावेतो आहे. दिनांक ०४/०५/२०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार असून नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम दिनांक ०६/०५/२०२४ रोजी पावेतो आहे.

अशावेळी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्याच्या ठिकाणी निवडणूक संबंधाने राजकीय पक्ष आपआपले शक्ती प्रदर्शन करण्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस मोठया प्रमाणावर जनसमुदाय एकत्र येण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणांच्या प्रांगणात निवडणुक संबंधाने कॉर्नर मिटींग, सभा, पत्रकार परिषद इ. सारखे कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निवडणुक प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होवुन सदर ठिकाणी शांतता भंग होण्याची दाट शक्यता आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी उपरोक्त परिस्थितीत मी **' सचिन गोरे ' पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा ठाणे शहर** आम्हास **पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी कार्यालयीन आदेश क्र.पोउपआ/ वि.शा./१३२/२०२३, दिनांक २७/१२/२०२३ अन्वये** आम्हांस प्रदान केले असल्याने, त्या अधिकारांचा वापर करून असे निर्देश देतो की, अशा ठिकाणांच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजुकडील परिसरात कोणत्याही पक्षाचे पदाधिकारी/संघटनेचे पदाधिकारी/कार्यकर्ते आणि प्रतिनिधी यांनी निवडणुक संबंधाने सभा/बैठक/पत्रकार परिषद आदी कार्यक्रम घेऊ नये. त्याचप्रमाणे नामनिर्देशन अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार व त्याच्या सोबत ४ व्यक्ती यांनाच निवडणुक निर्णय अधिकारी यांच्या कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल. त्याचप्रमाणे उमेदवारी अर्ज दाखल करण्यास येणाऱ्या उमेदवारास नमुद ठिकाणच्या कार्यालयाच्या १०० मीटर चहुबाजुकडील परिसरामध्ये फक्त तीन वाहने आणण्याची परवानगी देण्यात येत असून तीन पेक्षा अधिक वाहने **सदर कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात आणण्यास प्रतिबंध घालण्यात येत आहे.**

वरील आदेशाचे कोणीही व्यक्तीने उल्लंघन केल्यास अशा व्यक्तीविरूध्द **भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**सदर आदेश दिनांक २६/०४/२०२४ रोजी ००.०१ पासुन दिनांक ०६/०५/२०२४ रोजी २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.**

सदरचा आदेश शासकीय कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना तसेच शासकीय/ निमशासकीय, निवडणुक कामकाजाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना लागू होणार नाही.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्यानिशी आज दिनांक १८/०४/२०२४ रोजी ठाणे येथे जारी करण्यात आला आहे.

दिनांक :१८/०४/२०२४

शिक्का

( सचिन गोरे )
**पोलीस उप आयुक्त,**
**विशेष शाखा, ठाणे शहर**